Mukul Madhav
Foundation
Established 1999

SPREAD HOPE, SPREAD HAPPINESS.

ऑक्टोबर २०१९

## ऑक्टोबर २०१९ चे वार्तापत्र

प्रिय मित्रांनो,

या महिन्यातील विविध उपक्रमांची माहिती तुमच्यापर्यंत पोहचवण्याची आम्ही ही संधी घेत आहोत. आशा आहे ते वाचायला तुम्हांला नक्की आवडेल.

आपली विश्वासू,

**रितू प्रकाश छाब्रिया**
व्यवस्थापकीय विश्वस्त
मुकुल माधव फाऊंडेशन

### २८ सप्टेंबर २०१९ केईएम रुग्णालयात मासिक मधुमेह चाचणी शिबिर




१२ रूग्णांची नियमित रक्तातील साखरेची तपासणी झाली आणि ७ रुग्णांना इन्सुलिन देण्यात आले.

### २९ सप्टेंबर मोतिबिंदू शस्त्रक्रिया, झारखंड




झारखंडमधील हजारीबाग येथील एलएनजेपी नेत्र रुग्णालयात बिहार आणि झारखंडमधील १०० ज्येष्ठ रूग्णांना मोफत मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी सहाय्य केले. आम्ही २०१८ पासून नव भारत जागृती केंद्राला मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी मदत करत आहोत. तेव्हापासून आम्ही ३०० ज्येष्ठ नागरिकांच्या मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत.

### ३० सप्टेंबर २०१९ - जयपूर येथे शौचालये



जयपुरातील केळकाबास हे गाव आहे ज्यात प्रत्येक कुटुंबात प्लंबर आहेत. शाळेत स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५०० असलेल्या राजकीय उच्च माध्यमिक विद्यालयाकडून आवाहन करण्यात आले होते. एक शौचालय ब्लॉक

४ शौचालय आणि मुलींसाठी २ हात धुण्यासाठी नळांसह एक पाण्याचा कुंड आणि मुलांसाठी ६ शौचालयांसह एक पाण्याचा कुंड आणि २ नळ पुरविला गेला आहे. ही सोय हे सुनिश्चित करेल की शाळेत विशेषत: मुलींची उपस्थिती जास्त आहे.

### ५ ऑक्टोबर २०१९ - ज्येष्ठ नागरिकांसाठीचे शिबिर, प्राथमिक आरोग्य केंद्र, सातारा






शिबिराचा एक भाग म्हणून १२७ ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करण्यात आली. ८९ लोकांची रक्ततपासणी, ७२ लोकांची फिजिओथेरपी आणि अस्थिरोगतज्ञांची भेट, १५ मानसोपचारतज्ञ, १० दंतरोगतज्ञ, १२ जणांची प्रसूतीतज्ञ यांच्यातर्फे तपासणी करण्यात आली. ३ रुग्णांना मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

### जून २०१८ पासून आत्तापर्यंत १५०० ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करण्यात आली.






### ७ ऑक्टोबर २०१९ - बीएआयएफ (भारत ॲग्रो इंडस्ट्रीज फाउंडेशन), नाशिकच्या माध्यमातून १०० महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण

फिनोलेक्स इंडस्ट्रीजने बीएआयएफच्या सहकार्याने कृषी क्षेत्रातील बदलकर्ते म्हणून १०० महिला कामगारांना सक्षम करण्याच्या दृष्टीने येथे प्रकल्प सुरू केला. महिला शेतकर्यांच्या क्षमता सुधारण्यासाठी सुधारीत कृषी पद्धती, शेती यांत्रिकीकरणाचा परिचय आणि इतर शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या माध्यमातून खूप जवळून काम करण्याचा हा प्रकल्प आहे.

सुधारीत शेती पद्धती इतर कुशल महिलापर्यंत पोहचविल्यास त्या महिला इतर ५०० हून अधिक महिला शेतकऱ्यांना सुधारित शेती पद्धतींबाबत जागरूक करतील. ऑक्टोबर २०१९ ते सप्टेंबर २०२० या कालावधीत १२ महिन्यांच्या कालावधीत नाशिकच्या सिन्नर केंद्रातील आठ ते दहा गावे व्यापून टाकलेल्या प्रत्येक केंद्रामध्ये हा प्रकल्प राबविला जाईल.

### ९ ऑक्टोबर २०१९ - महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या कृषी महाविद्यालयांसाठी श्रीमती. मोहिनी प्रल्हाद छाब्रिया शिष्यवृत्ती





श्री.के.पी. विश्वनाथ, फुले कृषी विद्यापीठ, अहमदनगर, श्री. रसाळ, डीन, कृषी महाविद्यालय, पुणे, डॉ. परांडे, शिक्षण संचालक महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, देवांग त्रिवेदी, कंपनी सेक्रेटरी, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि श्रीमती रितु प्रकाश छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त, मुकुल माधव फाउंडेशन यांच्या उपस्थितीत ४ जून २०१९ रोजी यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत मुकुल माधव फाऊंडेशन या विद्यापिठामध्ये ३६ पदवीधर, २० पदव्युत्तर आणि ३ पीएचडी करणाऱ्या समाजातील खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व मदत प्रदान करणार आहेत.

पुणे, जळगाव, कोल्हापूर आणि नंदुरबार कृषी महाविद्यालयात घेण्यात आलेल्या बीएससी (ग्री), बीएससी (हॉर्ट) साठी ६५ विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली. डीन डॉ. रसाळ, एसडब्ल्यूओ प्रो.पाटील आणि मुकुल माधव फाउंडेशनचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी १६ विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

## पुनर्मूल्यांकन शिबीर








एकूण १२२ सेरेब्रल पाल्सी रूग्णांची तपासणी पुण्यातील तज्ज्ञ डॉक्टरांनी केली होती आणि त्यांना शस्त्रक्रिया, ऑर्थोटिक्स, ऑप्टोमोलॉजिस्ट, स्पीच थेरपी, श्रवणयंत्र आणि औषधांसाठी सुचविण्यात आले. सातारा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान या शिबिरास मिळाले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भागवत यांनी शिबिराच्या ठिकाणी भेटही दिली. आरबीएसके चमूने रुग्णांना कार्यक्रमस्थळी आणण्यासाठी वाहतुकीच्या सुविधा पुरवून सहाय्य केले.

## १९ ऑक्टोबर २०१९ - बी टी सहानी शाळेचे उद्घाटन





बी टी सहानी शाळेचे नूतनीकरण इंग्रजी विभागात नवीन वर्गखोल्या, संगणक लॅब, मुला-मुलींसाठी स्वच्छतागृहे आणि बहुउद्देशीय हॉलद्वारे करण्यात आले. याचे उद्घाटन साधू वासवानी मिशनच्या दीदी कृष्णा कुमारी यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाला श्री प्रकाश छाब्रिया आणि श्रीमती रितु प्रकाश छाबरीया यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे फाउंडेशन व शाळेतील इतर सदस्य देखील उपस्थित होते.

## १९ ऑक्टोबर - टाटा स्ट्राइव्हसह कौशल्य उपक्रम



फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशन विविध कौशल्य विकास संस्थांच्या माध्यमातून प्लंबिंग, रेडिओलॉजी, टेलरिंग, कॉम्प्यूटर्स या क्षेत्रातील तरुणांना कौशल्य देण्यामध्ये गुंतले आहेत.

नुकतेच टाटा स्ट्राइव्ह या कौशल्य विकासाचा पुढाकार असलेल्या टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्ह ट्रस्ट आणि फिनोलेक्स यांच्यामध्ये जीडीए (जनरल ड्यूटी असिस्टंट्स) क्षेत्रात असणाऱ्या तरुण मुलींना प्रशिक्षण देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

१९ ऑक्टोबर रोजी फिनोलेक्स सिटी ऑफिस येथे फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे श्री देवांग त्रिवेदी आणि टाटा स्ट्राइव्हचे श्री. सुधाकर गुढीपती यांनी सामंजस्य करार केला. या समारंभाचे साक्षीदार होण्यासाठी आमच्याकडे दोन्ही संस्थांचे सदस्य उपस्थित होते ज्यामध्ये मुकुल माधव फाउंडेशन च्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती रितु प्रकाश छाब्रिया यांचाही समावेश आहे.

टाटा स्ट्राइव्हला देण्यात येणाऱ्या निधीतून १०० जीडीए ७ आठवड्यांच्या वर्ग प्रशिक्षण आणि ओजेटीच्या ४ आठवड्यांच्या कालावधीत (नोकरीच्या प्रशिक्षणात) प्रशिक्षित असतील. जोपर्यंत त्यांना नोकरी मिळत नाही तोपर्यंत टाटा स्ट्राइव्हतर्फे किमान १० हजार किंवा अधिक वेतन देऊन मदतीचा हात देण्यात येणार आहे.

### २४ ऑक्टोबर - उस्मानाबादमधील विधवा शेतकऱ्यांसमवेत दिवाळी साजरी




८ जून २०१९, ३१२ महिला शेतकऱ्यांनी श्री. चंद्रकांतदादा पाटील, कृषी मंत्री, महाराष्ट्र यांची भेट घेतली. त्यांनी या महिलांचे अभिनंदन केले आणि एफआयएल आणि एमएमएफ यांच्या सहकार्याने व महाबीज यांच्या सहयोगाने प्रत्येकाला ३० किलो सोया आणि १५ किलो तूर बियाणे हस्तांतरित करण्यास मदत केली. महाबिज (महाराष्ट्र राज्य बियाणे कॉर्पोरेशन लि. अर्थात महाबिज नावाने परिचित असलेली सर्वात मोठी आणि अग्रणी राज्य बियाणे कॉर्पोरेशन आहे) चांगल्या पावसामुळे लवकरच पिके घेण्यास मदत झाली असून लवकरच कापणी करण्यात येईल. केव्हीके त्यांना पुन्हा लातूरच्या बाजारात पॅकेज व विक्री करण्यास मदत करतील. समग्र पध्दतीने उस्मानाबादला पाठिंबा देताना एफआयएल / एमएमएफ यांनी पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने जलसंधारणाच्या कामासाठी एका गावाला पाठिंबा दिला आणि त्यामध्ये जनसमुदाय सहभाग खूप प्रेरणादायी होता. हे पुढे नेण्यासाठी आम्ही आता सरकारी संस्थांशी हातमिळवणी करीत आहोत आणि महिलांना आणखी एका प्रकल्पात उद्योजक कसे करता येईल याकडे लक्ष देत आहोत. ते पाहणे म्हणजे स्वतःचा लघु उद्योग विकसित करणे. यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क पुणे यांच्या सहकार्याने एसओवायए दूध उत्पादन करणे आणि एमएसकेव्हीबीके (महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ) च्या सहकार्याने मध उत्पादन यांचा समावेश असेल. दिवाळी साजरी करण्यासाठी किराणा आणि भेटी या महिलांना देण्यात आल्या.

## मसार कडून प्राप्त माहिती

### ७ ऑक्टोबर २०१९ - गावसड कौशल्य विकास केंद्रात प्रमाणपत्र वितरण




गावसाड गावातील स्किल डेव्हलपमेंटच्या १३ विद्यार्थ्यांना ७ ऑक्टोबर २०१९ रोजी टेलरिंगचे प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रे देण्यात आली. कौशल्य केंद्र, त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी व्यावसायिक टेलरिंग प्रशिक्षण देण्यावर लक्ष केंद्रित करते.

### १७ ऑक्टोबर आणि २३ ऑक्टोबर- सॉखडाकुर्द व वडू गावात वृक्षारोपण




११० आणि ५० कडूलिंबाची लागवड करुन झाडांचे संरक्षण करणारे प्रत्येकी ३० कुंपण सोखडाकुर्द व वडू गावात दान करण्यात आले.

## रत्नागिरीहून प्राप्त झालेली माहिती

### ९ ते २३ ऑक्टोबर - संकल्प २०१९ - मॅमोग्राफी शिबीर





नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून महिलांच्या आरोग्याच्या उन्नतीसाठी वालावलकर हॉस्पिटल डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने एफआयएल / एमएमएफच्या वतीने दि. ९ ते २३ ऑक्टोबर २०१९ दरम्यान डेरवण येथे संकल्प २०१९ या महिलासाठीच्या मैमोग्राफी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर विशेषत: महिला पोलिस अधिकारी, त्यांचे जोडीदार व पोलिस कर्मचाऱ्यांच्या महिला नातेवाईकांसाठी घेण्यात आले होते. या शिबिरामध्ये ४२१ महिलांची तपासणी करण्यात आली.

### २२ ऑक्टोबर - बेंच डोनेशन





श्रीमंता विजयसिंह राजे पटवर्धन इंग्रजी शाळा कोतवडे येथील विद्यार्थ्यांसाठी १५० बेंच देण्यात आल्या आहेत.

### १९ आणि २० ऑक्टोबर - मासिक सीपी कॅम्प



फिनोलेक्स रिहॅब सेंटर येथे मासिक न्यूरोफिजिओथेरपी शिबिराचे आयोजन केले गेले होते जेथे २९ रुग्णांची तपासणी केली गेली.

## मुकुल माधव विद्यालयामधील माहिती

### ७ ऑक्टोबर - दसरा उत्सव



मुकुल माधव विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात व उर्जेने शाळेत दसरा साजरा केला. सरस्वती देवीच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजा करण्यात आली. दसऱ्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तर वाईटावर चांगल्या गोष्टींचा विजय दर्शविणारी गाणी आणि नाटिका यासह विविध उपक्रमांनी या कार्यक्रमाचा सोहळा रंगला. या दिवसासाठी विद्यार्थ्यांनी आकर्षक पोशाख परिधान केला होता.

### २५ ऑक्टोबर - दिवाळी साजरी





दिवाळीचा, दिव्यांचा उत्सव, मुकुल माधव विद्यालयात २५ ऑक्टोबर २०१९ रोजी संपूर्ण शाळेत अवतरला होता. सर्वत्र दुष्कर्मांवर विजय मिळवणे चांगले कसे आणि देशभरात दिवाळी का आणि कशी साजरी केली जाते याबद्दल विद्यार्थ्यांनी उत्सवाचे महत्त्व सांगितले.

**३७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य - रु. ११, ७५, ००० / -**

**४७ रुग्णांना वैद्यकीय सहाय्य - रु. १२,८५,०००/-**

**आम्ही आमच्या उदार देणगीदारांना धन्यवाद देऊ इच्छितो**

### या महिन्यासाठी देणगीदार

**१. पन्याम फॅमिली चॅरिटेबल ट्रस्ट**

**२. डेक्कन इन्शुरन्स न्ड रीन्स ब्रोकर प्रायव्हेट लिमिटेड**

**३. हर्षिल कारिया**

**आमच्या सर्व उपक्रमांना नेहमी समर्थन देण्यासाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे विशेष आभार !**

फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे विशेष आभार जे आमच्या सर्व उपक्रमांना भरभरुन प्रतिसाद देतात.

**मुकुल माधव फाऊंडेशन आपणाकडून मिळत आलेल्या मदतीसाठी व आधारासाठी अत्यंत आभारी आहे!!**

**मुकुल माधव फाऊंडेशन टीम !!!**